IMPACT FACTOR 5.473 (SJIF)
UPA NATIONAL E-JOURNAL
Interdisciplinary Peer-Reviewed Indexed E-Journal
ISSN 2455-4375

# कोविड–१९ चा सामाजिक–सांस्कृतिक जीवनावर झालेला परिणाम

**डॉ. राजेंद्र ज. कांबळे**
प्राध्यापक तथा समाजशास्त्र विभागप्रमुख,
इंदिरा गांधी कला–वाणिज्य महाविद्यालय,
कळमेश्वर जि. नागपूर
rajendrakamble2020@gmail.com
9850526319

---

**सारांश –**

भारताने कोरोनाच्या रुग्णसंख्येत इतर देशांना मागे टाकत जगात तिसरा क्रमांक घेतला. ३१ डिसेंबर २०१९ पासून कोरोना महामारीने थैमान घातले. अनेक कुटुंब उद्ध्वस्त केलेत, अनेकांचे रोजगार गेले, शारीरिक अपंगत्व आले, अनेक मुले आई–वडिलांविना पोरकी झालीत, कुटुंबात तणाव निर्माण झाला, शैक्षणिक व्यवस्था कोलमडून पडली, उद्योगधंदे बंद पडलेत, स्थलांतरित मजूरांना स्वगृही परत जाताना पायपीट करावी लागली, अनेक स्थलांतरितांचे प्राण गेले असे असंख्य स्वरूपाचे परिणाम कोरोना महामारीमुळे संपूर्ण जगावर झालेत. याविषयी सर्व जग परिचित आहे.

या शोधनिबंधाच्या माध्यमातून सामाजिक व सांस्कृतिक जीवनावर झालेले परिणाम जाणून घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**संशोधन पद्धती –**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी वर्णनात्मक संशोधन आराखड्याचा वापर करण्यात आला.

**प्रस्तावना –**

कोरोना (कोविड–१९) या व्हायरसचे केंद्र चीनमधील वुहान शहर हे आहे. कोरोनाची लागण सुरुवातीला या शहरात झाली. नंतर या देशात वास्तव्यास असलेल्या १९ विदेशी नागरिकांनाही कोरोनाची लागण झाली. विदेशी नागरिक जसजसे आपल्या देशात परतू लागले तसतसा कोरोनाचा प्रसार इतर देशांत होऊ लागला. परंतु, ही बाब चीन सरकारने जाहीर केली नव्हती. कोरोना विषाणूच्या भीषण धोक्याबद्दल जानेवारी २०२० च्या प्रारंभीच इशारा देणाऱ्या डॉ. ली वेनलिआग यांच्यावर अफवा पसरविण्याचा आरोप ठेवून पोलिसांनी त्यांचा छळ केला.

कोविड–१९ व्हायरस वेगवेगळ्या लोकांना वेगवेगळ्या प्रकारे प्रभावित करतो. बऱ्याच संक्रमित लोकांमध्ये सौम्य ते मध्यम लक्षणे असतात आणि त्यांना रुग्णालयात दाखल न करता ते बरे देखिल होतात.

**अधिक सामान्य लक्षणे** – ताप, कोरडा खोकला, थकवा

**कमी सामान्य लक्षणे** – ठणक व वेदना होणे, घसा खवखवणे, जुलाब होणे, डोळे लाल होणे, डोकेदुखी, चव किंवा गंध न कळणे, त्वचेवर पुरळ येणे किंवा हाताच्या बोटावर किंवा पायांच्या बोटावर डाग येणे

कोणतेही संशोधन कार्य करीत असताना त्याविषयाशी संबंधित पूर्वी झालेल्या संशोधनाचा आढावा घेणे अतिशय आवश्यक आहे. यामुळे संशोधनाशी संबंधित विषयावर किती प्रमाणात संशोधन झाले आहे याची माहिती प्राप्त होते. त्यामुळे संबंधित संशोधन विशयावर आतापर्यंत ज्या घटकावर संशोधन झाले आहे

त्याचा आढावा घेऊन हा शोधनिबंध पूर्णत्वास गेलेला आहे. निष्कर्ष व संबंधित साहित्याचे समालोचन पुढीलप्रमाणे आहे.

१) अंजली जोशी (२०२०) यांनी लॉकडाऊन आणि कौटुंबिक हिंसाचाराची दाहकता या विषयावर संशोधन केले. त्यांच्या संशोधनातून प्राप्त परिणाम पुढीलप्रमाणे आहेत—

भारतात लॉकडाऊन सुरू झाल्यानंतर काही दिवसांतच कौटुंबिक हिंसाचाराच्या ई—मेलच्या माध्यमातून येणाऱ्या तक्रारींमध्ये वाढ झाल्याचे राष्ट्रीय महिला आयोगाने नमूद केले आहे. २३ मार्च ते १ एप्रिल २०२० पर्यंत आयोगाकडे हिंसाचाराच्या तक्रारींची २३९ प्रकरणे नोंद झाली आणि दर दिवशी त्यात वाढ होत गेली. वास्तवता अशी आहे की, कौटुंबिक हिंसाचाराची प्रकरणे यापेक्षाही जास्त आहेत. परंतु, ई—मेलसारखी माध्यमं स्त्रियांकडे नसल्यामुळे अशी प्रकरणे समोर येऊ शकत नाहीत. लॉकडाऊन काळात अत्याचारित स्त्रियांना माहेरी जाण्याचा पर्यायही उरला नाही. वैद्यकीय मदतही त्यांना घेता आली नाही.

२) विद्या खंडारे (२०२०) यांनी ‘कोरोना महामारीचा भारतीय समाजावरील परिणाम’ या विषयावर अध्ययन करून त्यांनी पुढील निष्कर्ष मांडलेत—

कोरोना विषाणूमुळे भारतीय समाजव्यवस्थेतील आर्थिक देवाण—घेवाणीस हादरा बसला. कोरोनामुळे निर्यातीला फटका बसला. अनेक देशांची निर्यात ठप्प झाली. आपल्याकडील शेतकऱ्यांपासून तर व्यापाऱ्यांपर्यंत आणि कामगारांपासून तर उद्योजकांपर्यंत सगळेच हवालदिल झाले आहेत.

३) प्रमिला भुजाडे (२०२०) यांनी संशोधनात ‘कोरोना कालावधीतील समस्यांना समाजशास्त्रीय अभ्यास’ यावर अध्ययन केले असता पुढील निष्कर्ष निघालेत—

- कोरोनामुळे समाजात क्लेषदायक परिस्थिती निर्माण झाली आहे. प्रत्येक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीस संशयपूर्ण बघत आहे. सामाजिक ओलावा कमी होऊन सामाजिक दुरावा, आंतक्रियामध्ये कमतरता जाणवत आहे. सामाजिक अंतर वाढत जाऊन लोकांच्या आंतरक्रिया कमी होऊन मानवीय व्यवहार भावनिक रित्या शुन्य होताना दिसून येत आहे.
- पूर्वी ग्रामीण भागात सांमजस्य, तडजोड या भावना दिसून येत होत्या. परंतु ग्रामीण जीवनात बदल दिसून आले. कोरोना झालेल्या रुग्णांच्या कुटुंबापासून सर्वसामान्य लोक अलिप्ततेने वागताना दिसून येत आहे.
- अनेक व्यक्ती रोजगारापासून विन्मुख झाले आहेत. कामगारांना कमी केल्यामुळे ते स्थलांतरित झाले आहे. काही लोकांना अर्धवेतन, बेरोजगारी, कामावरून कमी करणे यासारख्या समस्या निर्माण झाल्या. परिणामत: जीवनात उदासिनता, नैराश्य, वैफल्यता, आत्महत्या अशा अनेक समस्या निर्माण झाल्या. लोकांवर उपासमारीची वेळ आली आहे. दारिद्र्यावस्थेत राहणाऱ्या लोकांना दोन वेळच्या जेवनात २४०० कॅलरीजसुद्धा मिळत नाही. परिणामत: शारीरिक आरोग्य विषयक समस्या उद्‌भवल्या आहेत.
- व्यक्ती जीवनात अलिप्तता आली आहे. प्रसारमाध्यमांमुळे होणारे परिणाम व त्यातून व्यक्ती जीवनात मानसिक रित्या पंगुत्वाकडे वळला आहे. जीवनाबद्दलची भीती, दया, करूणा यातून व्यक्ती मानसिक स्वरूपाने असुरक्षित जीवन जगत आहे.
- आज परंपरागत शिक्षणाची घडी अस्ताव्यस्त झाली आहे. ब्लॅन्डेड शिक्षा पद्धती अध्यापनाकरिता वापरली जात आहे. इतकेच नव्हेतर ज्या विद्यार्थ्यांजवळ नवीन अत्याधुनिक तंत्राचा अभाव आहे ते शिक्षणापासून

दूर जातील की काय अशी भीती निर्माण झाली आहे. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासात आजची शिक्षणप्रक्रिया उपयुक्त नाही. व्यक्ती सुरक्षितता म्हणून विद्यार्थीसुद्धा समोरासमोरच्या अध्यापन, अध्ययन पद्धतीपेक्षा ऑनलाईन शिक्षणाकडे वळलेला दिसतो. मात्र अप्लाईड शिक्षणापासून वंचित झाला आहे.

४) शुभा नीखरा (२०२०) यांनी 'लॉकडाऊन का परिवार पर सामाजिक एंव आर्थिक प्रभाव' या विषयावर शोधनिबंध प्रकाशित केला. त्यांना पुढील निष्कर्ष आढळून आले–

आज कोरोना के डर से व्यक्ती सामाजिक, पारिवारिक संबंधो आदि में स्वेच्छा से परिवर्तन कर रहा है। इन्ही सब तथ्यों से प्रभावित होकर शोधार्थिनी के द्वारा समाज में वैवाहिक स्वरूप व धन का अपव्यय और पारिवारिक संबंधो का अध्ययन किया। जिसमें पाया कि लॉकडाऊन में विवाह के स्वरूप पर प्रभाव पडा। जिससे रिश्ते सिमट कर परिवार तक ही सीमित रह गए है तथा अनावश्यक वैवाहिक रूढिवादिताओंको त्याग कर वैवाहिक कार्यक्रमों में धन का अनावश्यक व्यय रोकने के साथ–साथ आवश्यक कार्यों का निर्वाहन कर वैवाहिक कार्यक्रम संपन्न किए जा रहे है।

५) डॉ. रमजान मुजावर व शैलजा माने (२०२०) यांनी 'कोविड–१९ आणि महाराष्ट्राती स्थलांतरित मजुरांच्या आर्थिक आणि सामाजिक समस्या' या विषयावर शोधनिबंध प्रकाशित केला. त्यात त्यांनी पुढील निष्कर्ष मांडले–

- कोरोनामुळे आत्महत्येचे प्रमाण वाढले.
- कोरोनामुळे गुन्हेगारीचे प्रमाण वाढेल.
- कोरोनामुळे व्यसनाधिनता वाढेल.
- मजुरांची मुले शिक्षणापासून वंचित राहतील.
- असंघटित क्षेत्राला तडाखा बसेल.
- मानसिकता ढासळेल.

**संदर्भ**

१) दै. लोकमत, दि. ०८.०२.२०२०
२) दै. लोकमत, दि. २१.०६.२०२०
३) समाज  ाास्त्र सं  ाोधन पत्रिका, अंक २५ वा, डिसेंबर २०२०
४) Social Issues and Problems (National Journal) Volume- 09, Issue- 1, July 15, 2020.